उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये सोयी-सवलती देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ३०२/विशि-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४ मार्च, २०१७.

प्रस्तावना:-

राज्यातील सर्व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांचे अध्ययन, अध्यापन व मुल्यमापनाची पध्दती वेगळी असणे आवश्यक आहे. विषेश गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना शैक्षणिक मुल्यमापनामध्ये गरजेनुरूप सोयी सवलती देण्यासंदर्भात धोरण निश्चितीसाठी शासन स्तरावरुन समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकीमध्ये सर्व अकृषी विद्यापीठाचे परिक्षा नियंत्रक व दिव्यांगांशी संबंधीत असलेल्या विविध संस्थांचे तज्ञ प्रतिनिधी उपस्थित होते. सदरहू बैठकीमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणामध्ये येणाऱ्या अडचणी व परिक्षा पध्दतीमध्ये त्यांना दिल्या जात असलेल्या व आवश्यक असलेल्या सोयी सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व त्यानुसार आवश्यक त्या सूचना व अभिप्राय मागविण्यात आले. प्राप्त अभिप्राय व सूचनांचा विचार करून उच्च शिक्षण/विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार खाली नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांची खालीलप्रमाणे वर्गवारी आहे.

१. पूर्णत: अंध (Blindness)
२. अंशत: अंध (Low vision/ Partial Blind)
३. कुष्ठरोग निवारित ( Leprosy Cured Persons)
४. कर्णबधिर (Hearing Impairment - deft and hard of hearing )
५. लोकोमोटर डिसेबिलिटी अस्थिव्यंगासह (Locomotor Disability including Orthopedic disability)
६. शारिरीक वाढ खुंटणे (Dwarfism)
७. बौध्दिक अक्षम (मतिमंद/गतिमंद) (Intellectual Disability -Mentally challenged/Slow Learners)
८. मानसिक आजार (Mental Illness)
९. स्वमग्न (Autism Spectrum Disorder)
१०. सेरेब्रल पाल्सी (Cerebral palsy)
११. स्नायुंची विकृती (Muscular Dystrophy)
१२. मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological Conditions)
१३. अध्ययन अक्षम (Specific Learning Disabilities)
१४. बहुविध दृधन अपदयरर (Multiple Sclerosis)
१५. भाषण (वाचा) व भाषा अक्षमत्व (Speech and Language Disability)
१६. थॅलस्सेमिया (Thalassemia)/ कॅन्सर (Cancer)
१७. हिमोफिलिया (Hemophilia)
१८. सिकल सेल आजार (Sickle Cell Disease)
१९. बहुविकलांग (Multiple Disabilities)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
## परीक्षा विभाग

दिनांक : १०.०३.२०१७

प्रति,
प्राचार्य/केंद्रप्रमुख/विभागप्रमुख
सर्व संलग्नीत महाविद्यालये.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषय: उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये सोयी-सवलती देणेबाबत.**
संदर्भ: शासननिर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ३०२/विशि-३ संकेतांक: २०१७०३०४१३१६२५२३०८

महोदय,

उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये सोयी-सवलती देणेबाबत महाराष्ट्र शासनाने वरील संदर्भीय आदेशाद्वारे कळवले आहे.

या निर्णयाप्रमाणे खालीलप्रमाणे विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांची खालीलप्रमाणे वर्गवारी केलेली आहे.

१. पूर्णतः अंध (Blindness)
२. अंशतः अंध (Low vision Partial Blind)
३. कुष्ठरोग निवारित (Leprosy Cured Persons)
४. कर्णबधिर (Hearing Impairment – deft and hard of hearing)
५. लोकोमोटार डिसेबिलिटी अस्थिव्यंगासह (Locomotor Disability including Orthopedic disability)
६. शारिरीक वाढ खुंटणे (Dwarfism)
७. बौध्दिक अक्षम (मतिमंद/गतिमंद) (Intellectual Disability – Mentally challenged/Slow Learners)
८. मानसिक आजार (Mental Liness)
९. स्वरमग्न (Autism Spectrum Disorder)
१०. सेरेब्रल पाल्सी (Cerebral palsy)
११. स्नायुंची विकृती (Muscular Dystrophy)
१२. मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological Conditions)
१३. अध्ययन अक्षम (Specific Learning Disabilities)
१४. बहुविध दधन अपदगरर (Multiple Sclerosis)
१५. भाषण (वाचा) व भाषा अक्षमता (Speech and Language Disability)
१६. थॅलस्सेमिया (Thalassemia) / कॅन्सर (Cancer)
१७. हिमोफिलिया (Hermophilia)
१८. सिकल सेल आजार (Sickle Cell Disease)
१९. बहुविकलांग (Multiple Disabilities)
२०. ॲसिड ॲटॅक व्हिक्टीम (Acid Attack Victim)
२१. पार्किसन्स आजार (Parkinsons disease)

उपरोक्त सर्व प्रकारातील उच्च शिक्षण संस्थामधील/ विद्यापीठ स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना वरील संदर्भीय आदेशानुसार सोयी सवलती उपलब्ध करुण देण्याची व्यवस्था नियमानुसार आपल्या स्तरावर करण्यात यावी.
टिप. सविस्तर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१७०३०४१३१६२५२३०८ असा आहे.

संचालक, १०/३/१७
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

परीक्षा/समन्वय/प.म. 18122004(ट.क्र.4)/2005/

02.02.2005

# परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध परीक्षेस बसणाऱ्या अपंग परीक्षार्थी 40 % किंवा 40% किंवा त्या पेक्षा जास्त अपंगत्व (हात व डोळ्याने) असल्यास परीक्षार्थीने जिल्हा शल्य चिकित्सककडून अपंगत्वाचे प्रमाणपत्र परीक्षा केंद्र अधिक्षकांना सादर केल्यास नियोजित वेळेपेक्षा अर्धा तास (30 मिनिटे) जास्त वेळ पेपर सोडविण्यासाठी देण्यात यावा.

तसेच सदर परीक्षार्थी बाबत वेगळी नोंद घेऊन परीक्षार्थीने सादर केलेल्या अपंगत्वाच्या प्रमाणपत्र परीक्षेनंतर परीक्षा विभागात माहितीस्तव सादर करावे. सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून अंमलबजावणी करावी.

परीक्षा नियंत्रक

परिपत्रकाची प्रत खालील प्रमाणे सर्व संबंधितांना त्यांच्या माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येत हे.

1. सर्व विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
2. सर्व प्राचार्य (अधिष्ठाता), संचालक, सर्व संलग्न महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
3. उप कुलसचिव, पदव्युत्तर/शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
4. सह. कुलसचिव, परीक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
5. सर्व अधिक्षक/सहाय्यक अधिक्षक, परीक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
6. भांडारपाल, परीक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

परीक्षा नियंत्रक

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
## औरंगाबाद

### परीक्षा व मूल्यमापन विभाग

### परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक/परीक्षा केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील ऑक्टोंबर/नोव्हेंबर २०२० च्या मार्च-२०२१ मध्ये होणाऱ्या सर्व पदवी (अव्यावसायिक अभ्यासक्रम) अभ्यासक्रमांच्या परीक्षा या कार्यालयाचे पत्र क्र. परीक्षा/समन्वय/२०२१/११७४ दि. २४.०२.२०२१ नुसार दिनांक १६ मार्च २०२१ पासून सुरु झालेल्या आहेत. तसेच इतर अभ्यासक्रमाच्या परीक्षा त्यानंतर घेण्यात आलेल्या आहेत. सदर परीक्षा या ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. तरी दिनांक **१६.०३.२०२१ ते १२.०४.२०२१** या दरम्यान ज्या महाविद्यालये/परिसंस्थेने ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेतलेल्या आहेत त्यांनी सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार परीक्षेची देयके दोन (०२) प्रतीमध्ये या कार्यालयास मंजूरीसाठी सादर करावीत.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे.

**सोबत : वरीलप्रमाणे**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Examinations Aurangabad

विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद :
संदर्भ क्र.: परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/२०२१/1308 :
दिनांक : ०३.०५.२०२१ :
19

**प्रा. योगेश पाटील**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

ऑक्टोंबर नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा मार्च एप्रिल २०२१ मध्ये घेण्यात आल्या त्या बाबतचे परीक्षा केंद्रावरील कर्मचा-यांना दिले जानारे मानधन खालील प्रमाणे राहिल .

| अ.क्र. | पद | मानधन एक तासाकरीता |
|---|---|---|
| १ | केंद्र प्रमुख | रु. ७५ प्रती सत्र |
| २ | उप केंद्र प्रमुख (अन्डरस्टडी ) | रु. ७० प्रती सत्र |
| ३ | पर्यवेक्षक (Invigilator) | रु. ६० प्रती सत्र |
| ४ | क्लार्क/टायपिष्ट — कम संगणक चालक | रु. ५० प्रती सत्र |
| ५ | शिपाई | रु. ३० प्रती सत्र |
| ६ | वॉटरबॉय | रु. ३० प्रती सत्र |
| ७ | स्विपर | रु. ३० प्रती सत्र |
| ८ | ऑन लाईन प्रश्नपत्रिका डाऊनलोडर सहाय्यक | रु. ५० प्रती दिवस |
| ९ | प्रश्नपत्रिका (फोटोकॉपी ) झेरॉक्स ऑपरेटर | रु. ५० प्रती दिवस |
| १० | रेकॉर्ड रुम ङ्खिपर | रु. ३० प्रती दिवस |
| ११ | वॉचमन | रु. ३०/- प्रती रात्र १ लागू राहिल . |
| १२ | प्रश्नपत्रिका झेरॉक्स फोटोकॉपी इ. | ०.७० सत्तर पैसे प्रती पान प्रमाणे . |

संचालक

परीक्षा व मुल्यमापन मंडळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
## औरंगाबाद.

## परिपत्रक

सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक यांना कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद मार्फत ऑक्टोबर/नोव्हेबर २०२० च्या परीक्षा मार्च/एप्रिल २०२१ मध्ये ऑफलाईन व ऑनलाईन या दोन्ही पध्दतीनुसार घेण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने ऑफलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका मूल्यांकनाचे मानधन तसेच ऑनलाईन परीक्षांसाठी महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर नेमणूक करण्यात आलेल्या आय.टी.को-ऑर्डीनेटर यांच्या मानधनाचे दर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मान्य करण्यात आलेले आहेत

सदरील मानधनाचे दर हे ऑक्टोबर/नोव्हेबर २०२० च्या मार्च/एप्रिल २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या ऑफलाईन/ऑनलाईन परीक्षेसाठी लागू राहील , विद्यापीठाच्या नियमानुसार १०% टक्के रक्कम विद्यापीठ विकास निधी साठी कपात करण्यात येईल.

| अ.क्र. | तपशिल | मानधनाचे दर |
|---|---|---|
| ०१ | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम<br>१ ते ५० मार्क पर्यतेच्या प्रश्नपत्रिकेसाठी | रु. २/- प्रती उत्तरपत्रिका |
| ०२ | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम<br>५१ ते १०० मार्क पर्यतेच्या प्रश्नपत्रिकेसाठी | रु. ३/- प्रती उत्तरपत्रिका |
| ०३ | मार्क फीडिंग प्रती उत्तरपत्रिक | रु.०.३५ पैसे प्रती उत्तरपत्रिका |
| ०४ | आय.टी. को-ऑर्डीनेटर (समन्वयक)<br>(पुर्ण परीक्षेसाठी) | रु. १०००/-<br>(प्रती को-ऑर्डीनेटर) (पुर्ण परीक्षेसाठी) |

करिता, उपरोक्त दर्शविलेल्या दराप्रमाणे देयके तयार करुन या कार्यालयास सादर करण्यात यावे.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिध्द करण्या आले आहे.

विद्यापीठ प्रांगण )(
औरंगाबाद )(
संदर्भ क्र.परीक्षा/समन्वय/२०२०-२१/१३१५ )(
दिनांक: १५.०६.२०२१ )(

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , औरंगाबाद .

## // सर्वसाधारण सुचना //

सर्व प्राचार्य परीक्षा केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की ऑक्टोंबर नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा हया मार्च एप्रिल २०२१ मध्ये घेण्यात आल्या. कोविड १९ महामारीच्या संकटामुळे सामाजिक अंतराचे पालक करुन परीक्षा घेण्यात आल्या आहेत , पेपर हे सकाळच्या सत्रामध्ये एक तास व दुपारच्या सत्रामध्ये एक तास या प्रमाणे घेण्यात आलेल्या आहेत त्या बाबतचे मानधन खालील प्रमाणे राहिल. **जे विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर येऊन ऑफ लाईन नुसार परीक्षा दिली अशाच विद्यार्थ्यांचे देयके सादर करावे ऑन लाईन विद्यार्थ्यांची संख्या त्या मध्ये दर्शवू नये .**

- परीक्षा केंद्रावर कार्यरत असलेले कर्मचा-यांचे सुधारीत मानधन हे ऑक्टोंबर नोव्हेंबर २०२० मधील परीक्षा घेण्यात आलेल्या परीक्षा मार्च एप्रिल २०२१ च्या परीक्षेपासून लागू राहिल. प्राचार्य तथा परीक्षा केंद्र प्रमुख यांनी बँक खात्याची माहिती जसे खातेदाराचे नांव, खातेदाराचे बँकेचे नांव व पत्ता, खातेदाराचे बँक खाते क्रमांक, खातेदाराचा बँकेचा आयएफसी क्रमांक व संपर्क क्र. महाविद्यालयाच्या लेटरहेडवर प्राचार्याच्या स्वाक्षरीने सादर करणे आवश्यक आहे जेणे करुन महाविद्यालयाच्या बँक खात्यावर उर्वरीत रक्कम संगणक प्रणाली द्वारे ऑन लाईन पध्दतीने जमा करणे सोईस्कर होईल .
- परीक्षेचे देयके सादर करताना सर्वसाधारण सूचनेचे काटेकोर पालन करुन त्या नुसार देयके परीक्षा व मुल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे दोन प्रतीमध्ये सादर करणे आवश्यक आहे .
- विद्यापीठ परीक्षेचे देयके हे परीक्षा संपल्यानंतर लेखा परीक्षण करावे देयके परीक्षा संपताच एक महिन्याच्या आत सादर करावे काही कारनास्तव देयके सादर करणेबाबत उशिर झाल्यास जास्तीत जास्त सहा महिन्यापर्येत देयके सादर करावे जेणे करुन सदरचा खर्चाची नोंद ही चालू आर्थीक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूद मध्ये समाविष्ट करता येईल .
- कोविड १९ सामाजिक अंतर ठेवून विद्यार्थी परीक्षेस बसवणे एका परीक्षा हॉलमध्ये जास्तीत जास्त २५ या प्रमाणे विद्यार्थी संख्या बसवून त्यांची परीक्षा घेण्यात यावी या साठी १ ते २५ विद्यार्थ्यांसाठी एक पर्यवेक्षक या प्रमाणे नेमणूक करावी २५ विद्यार्थ्यांसाठी एक पर्यवेक्षक या प्रमाणे नेमणूक करणे आवश्यक आहे . रिलीव्हर जास्तीत जास्त दोन मान्य करण्यात येईल .
- सोबत जोडलेल्या नमुना मध्ये परीक्षा केंद्र प्रमुख/ सह केंद्र प्रमुख यांनी झालेल्या परीक्षेचे देयके तयार करुन परीक्षेमध्ये प्रत्यक्ष खर्च झाल्याबाबतचे दस्तऐवजाचा हिशोब प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने सादर करावा. हिशोबाचे लेखा परीक्षण करुन सनदी लेखापाल यांच्या अहवालासह हिशोब दोन प्रतीमध्ये सादर करावा. सादर केलेला हिशोब हा लेखा परीक्षण केलेला असल्यास लेखा परीक्षण शुल्क रु. ५०० (रु. पाचशे ) मंजूर करण्यात येईल .
- तपशिल ब व क यामध्ये दर्शविलेल्या मानधन व विद्यापीठाकडून मिळणारे इतर कोणतेही मानधन ( Remuneration/ Honorarium ) यावर विद्यापीठ विकास निधीकरीता एकूण रकमेच्या १० टक्के रक्कम लागू राहिल व ती रक्कम सादर केलेल्या देयकामधून कपात करण्यात येईल.
- केंद्र प्रमुख एक प्रति सत्र , उप केंद्र प्रमुख, क्लार्क, शिपाई, वॉटरबॉय, स्विपर प्रती सत्र ५०० विद्यार्थ्यांसाठी एक या प्रमाणे, मंजूर करण्यात येईल .

Govt. College of Arts & Science

कोविड
२०८



- रेकॉर्ड रुम किपर, प्रश्नपत्रिका सहाय्यक, झेरॉक्स ऑपरेटर प्रती दिवस एक या प्रमाणे परीक्षेच्या काळामध्ये लागू राहिल .
- रात्रीचा पहारेकरी (वॉचमन ) परीक्षेच्या काळासाठी प्रती रात्र एक या प्रमाणे लागू राहिल .
- अंतर्गत तपासणीसाची प्रती दिवस १ पुरुष व एक महिला असे जास्तीत जास्त दोन, या प्रमाणे परीक्षा काळामध्ये जर परीक्षा केंद्रावर नेमणूक असेल तर मान्य करण्यात येईल त्यासाठी रु. १०० प्रती दिवस मंजूर करण्यात येईल.
- संगणक प्रणाली द्वारे प्रश्नपत्रिका फोटोकॉपी (झेरॉक्स) साठीचा खर्च सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये सादर करणे अवश्यक आहे त्या साठी प्रती पान रु.०.७० पैसे ते देय राहिल .
- महाविद्यालय स्तरावर परीक्षेच्या काळामध्ये स्टेशनरी, कपडा, लाख, गम बॉटल, पेन, स्टॅंपपॅड रबर स्टॅंप, टोनर रिफीलींग, स्टिकर, प्रमाणपत्र व इतर किरकोळ खर्चासाठी परीक्षेमध्ये बसलेले परीक्षा फार्म नुसार प्रती विद्यार्थी रुपये ५/- या प्रमाणे देय राहिल . कोविड १९ साठी सानेटायझर , मास्क , खरेदी केले असल्यास त्याचे कॅश मेमो देयके रु. २०००/- च्या आत मुळ देयके (cash memo) सोबत जोडणे आवश्यक आहे .
- परीक्षा चालू होण्याच्या पुर्व दिवशी व परीक्षा संपल्यानंतर दुस-या दिवशी एक क्लार्क, एक शिपाई, एक अन्डरस्टडी, एक चिफ सुपरीटंडन परीक्षेच्या कामकाजाचे नियोजन करण्यासाठी मान्य करण्यात येईल .
- उपरोक्त परीपत्रकाच्या व्यतीरीक्त खर्च असल्यास त्या बाबत मा. कुलगुरुंच्या परवानगीशिवाय देयके मंजूर करता येणार नाही.
- सोबत दिलेल्या नमुन्यामधील देयकावर प्रत्येक पानावर उजव्या बाजून प्राचार्य किं वा केंद्र प्रमुख यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे .
- परीक्षेसाठी लागणा-या उत्तरपत्रिका, विद्यापीठाकडून प्राप्त झलेल्या उत्तरपत्रिका, परीक्षेसाठी वापर केलेल्या उत्तरपत्रिका, खराब झालेल्या उत्तरपत्रिका व परीक्षा संपल्यैंनंतर शिल्लक असलेल्या उत्तरपत्रिका, याचा हिशोबाचे रजिस्टर महाविद्यालयाने ठेवने अनिवार्य आहे. सदर रजिस्टरमध्ये वेळोवेळी नोंद घेऊन देयके सादर करतांना सोबत दर्शविलेल्या नमुन्यामध्ये उत्तरपत्रिकेचा हिशोब प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने सादर करणे आवश्यक आहे .
- कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे बहूपर्यायी प्रश्न पध्दतीने घेण्यात येणा-या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी प्राध्यापकांनी विद्यापीठास प्रश्नसंच सादर करण्यासठी प्रती प्रश्न रु. १०/- ( रुपये दहा प्रती प्रश्न) या प्रमाणे मंजूर करण्यात येईल .
- प्रात्यक्षिक परीक्षेसाठीचे दर पुर्वीच्या परीपत्रकाप्रमाणेच राहील त्या मध्ये बदल झालेला नाही .

संचालक

परीक्षा व मुल्यमापन मंडळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## परिपत्रक

विषय :- **०१ ऑक्टोबर २०२० पासून सुरु होणाऱ्या उन्हाळी २०२० च्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की दिनांक ०१ ऑक्टोबर २०२० पासून उन्हाळी २०२० च्या परीक्षा निश्चीत करण्यात आल्या होत्या. परंतु विद्यापीठातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लेखणीबंद आंदोलन सुरु केल्यामुळे उपरोक्त नमूद परीक्षा नियोजित वेळेत सुरु करणे शक्य नसल्यामुळे दिनांक ०१ ऑक्टोबर २०२० पासून सुरु होणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत.

सुधारीत वेळापत्रक स्वतंत्रपणे त्वरीत प्रकाशित करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

विद्यापीठ प्रांगण, )(
औरंगाबाद ४३१००४ )(
संदर्भ :- परीक्षा/२०२०/४६ )(
दिनांक :-२९/०९/२०२० )(

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

या परिपत्रकाची प्रत :-

१. मा. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
२. मा. स्वीय सहाय्यक, मा. राज्य मंत्री, उच्च शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
३. मा. स्वीय सहाय्यक, सचिव, राजभवन, मलबार हील, मुंबई.
४. मा. स्वीय सहाय्यक, अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
५. मा. संचालक, उच्च शिक्षण संचलनालय, पुणे.
६. सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
७. सर्व प्राचार्य, संचलित महाविद्यालये.
८. सर्व प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये.
९. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
१०. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## परीक्षा व मूल्यमापन विभाग
## अत्यंत महत्वाचे

परिपत्रक क्र: परीक्षा/गोपनीय कक्ष/२०२०/

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थाचे संचालक तसेच सर्व सबंधीत यांना कळविण्यात येते की, **मार्च/एप्रिल-२०२० च्या सर्व पदवी व पदव्युत्तर** अभ्यासक्रमाच्या **परीक्षा दिनांक.९.१०.२०२० व दि.१२.१०.२०२० पासून सुरु होत आहेत. परीक्षा केंद्रांवर जे विद्यार्थी OMR उत्तर पत्रिकेच्या माध्यमातून परीक्षा देणार आहेत. त्या विद्यार्थ्यांचा परीक्षेचा कालावधी (वेळ) हा सकाळच्या सत्रात सकाळी ११:३० ते १२:३० व दुपारच्या सत्रात दुपारी ०४.०० ते ०५.०० असा असणार आहे. (सदर कालावधी हा ज्या अभ्यासक्रमासाठी सकाळच्या सत्रात दोन पेपर व दुपारच्या सत्रात दोन पेपर आहेत त्यांना सुध्दा प्रत्येक पेपरला ३० मिनिटे या प्रमाणे एका तासाचा कालावधी असणार आहे)** त्या मुळे सदर विद्यार्थीना लागणाऱ्या प्रश्न पत्रिका Download करुण त्याना वाटप करणे आवश्यक आहे. सदर सर्व विषयाच्या प्रश्नपत्रिका Download करणे व त्या संबंधी करावयाची पुढील सर्व संबंधीत कामा बाबत खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक व क्रम:प्राप्त आहे.

| | |
|---|---|
| ०१ | प्राचार्य आणि केंद्रप्रमुखांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षेसाठी माहिती भरत असतांना फक्त प्राचार्य आणि केंद्रप्रमुखांनीच माहिती भरणे बंधनकारक राहील. महाविद्यालयातील इतर कोणत्याही कर्मचाऱ्यांची माहिती किंवा दुरध्वनी नंबर भरुन दिल्यास किंवा तसे निदर्शनास आल्यास तथा काही गैरप्रकार आढळल्यास त्यास संबंधीत प्राचार्य आणि केंद्रप्रमुख जबाबदार राहील, याची सर्व महाविद्यालयांनी गांर्भीयाने नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात काही गैरप्रकार आढळल्यास विद्यापीठा मार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| ०२ | सकाळी ०९.०० ते ११.०० आणि दुपारी ०१.३० ते ०३.३० या वेळेमध्येच विषय निहाय प्रश्नपत्रिका Download करणे बंधनकारक आहे. ११.०० वाजता आणि दुपारी ०३.३० वाजता प्रश्नपत्रिकेची लिंक बंद करण्यात येईल, लिंक बंध झाल्यानंतर पुन्हा चालू होणार नाही. याची सर्व परीक्षा केंद्रावरील सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी गांर्भीयाने नोंद घ्यावी. |
| ०३ | **प्रश्नपत्रिका Download करीत असतांना (Laptop) चा उपयोग करु नये. फक्त सीपीयू आणि मॉनिटरचा उपयोग करुन व वेब कॅमेरा चालू ठेऊन प्रश्नपत्रिका Download करण्यात यावी. महाविद्यालयात ज्या ठिकाणी गोपनीय कक्ष आहे, त्या ठिकाणी प्रश्नपत्रिका Download करण्यात यावी, व त्या ठिकाणी वेब कॅमेरा (CCTV) बसविणे बंधनकारक आहे.** |
| ०४ | वरील दर्शविलेल्या वेळेप्रमाणेच विद्यापीठाने जे परीक्षा केंद्र नेमुन दिलेले आहेत, अशा परीक्षा केंद्रांनी परिक्षार्थींच्या प्रवेशपत्रावरील विषयाप्रमाणेच प्रश्नपत्रिका Download करुण घेणे बंधनकारक आहे. |
| ०५ | ज्या अभ्यासक्रम विषयांच्या (कोड क्रमांकाच्या) प्रश्नपत्रिका Download केल्या आहेत त्याची काटेकोरपणे नोंद वहीत नोंद घेणे बंधनकारक आहे. प्रश्नपत्रिका Download केल्यानंतर सर्व प्रश्नपत्रिकांची पाने उपलब्ध असल्याचीही खात्री करुन घ्यावी, व आवश्यक तेवढयाच छायांकित (Photocopy) प्रति करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत केंद्रप्रमुखांची राहील. दररोज किती विषयांच्या प्रश्नपत्रिका छायांकित (Photocopy) प्रति काढल्या आहेत, त्या प्रत्येक विषयाच्या कोड नंबर प्रश्नपत्रिकेची नोंद दररोज पुस्तिकेत हिशोब ठेवणे बंधनकारक आहे. |
| ०६ | **प्रश्न पत्रिका Download केल्या नंतर केंद्रप्रमुख, सह केंद्रप्रमुख यांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी प्रश्नपत्रिका सदोष (बरोबर असल्या) बाबत खात्री करावी उदा. प्रश्नपत्रिकेवर दिलेला कोड नंबर / वर्ग / विषय / वेळ / पेपर क्रमांक/ पेपरचे पुर्ण नाव/ व दिनांक या बाबी वेळापत्रकाशी पडताळून पाहाव्यात. खात्री झाल्यानंतरच छायांकित (Photocopy) प्रती करुन परीक्षा दालनात बंद लिफाफ्यामध्ये पर्यवक्षकाकडे पाठविण्यात याव्या.** |

(कृ.मा.प)

Govt. College of Arts & Science

| | |
|---|---|
| ०७ | प्रश्नपत्रिका Download करेपर्यंत गोपीनय कक्षामध्ये केंद्रप्रमुखांनी उपस्थीत रहावे व त्यांच्या देखरेखीखालीच छायांकित (Photocopy) चे काम करण्यात यावे. सदर गोपनीय कक्षामध्ये केंद्रप्रमुखांनी नेमुन दिलेल्या कर्मच्याऱ्या कडून गोपनीयता राखणे बाबतचे हमीपत्र घेण्यात यावे, व नेमुन दिलेल्या कर्मच्याऱ्या व्यतिरिक्त इतरांना गोपनीय कक्षामध्ये प्रवेशास सक्त मनाई करावी. |
| ०८ | महाविद्यालया मध्ये ज्या ठिकाणी गोपनीय कक्ष आहे, त्या ठिकाणी परीक्षा संपेपर्यंत दररोज (CCTV) कॅमेरेचे फुटेजची नोंद होणे बंधनकारक राहील. गोपनीय कक्षाच्या व्हरांडयात ही (CCTV) कॅमेरे बसवणे बंधनकारक राहील. (CCTV) कॅमेरे मध्ये दररोज नोंद न झाल्यास विद्यापीठा मार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| ०९ | (CCTV) कॅमेरेची तपासणी प्राचार्य / केंद्रप्रमुख यांच्या देखरेखीत करण्यात यावी. विद्यापीठामार्फत केव्हांही परीक्षा केंद्राचे फुटेज (Videos) मागविण्यात येतील, अथवा तपासणी केली जाईल. |
| १० | परीक्षा सुरु होण्यापूर्वी व परीक्षा सुरु झाल्यानंतर केव्हांही विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी व दक्षता पथकातील सदस्य इत्यादी परीक्षा केंद्रांना आकस्मिक भेटी देतील व केंद्रावरील व्यवस्थापनाचे निरीक्षण करतील. |
| ११ | परीक्षा काळात परीक्षा केंद्रांना ग्रामस्थ, पत्रकार, छायाचित्रकार, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते यांना भेटी देण्याची परवानगी नाही. त्यांना परीक्षा दालनात प्रवेश देवू नये. अशा व्यक्ती परीक्षा केंद्रावर आल्यास त्यांना सौजन्याने योग्य प्रकारे नियमांची व जबाबदारीची जाणीव करुन द्यावी. |
| १२ | महाविद्यालयास पाठविण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिका कक्षामध्ये अत्यंत महत्वाच्या कामासाठी फक्त केंद्रप्रमुखानांच अथवा त्यांनी ज्यांना अधिकार दिलेले आहेत त्यांनाच साधा मोबाईलच वापरण्यास परवांनगी राहील तेथे इतर कोणालाही मोबाईलचा वापर करता येणार नाही, याची सर्व जवाबदारी केंद्रप्रमुखांची राहील. |
| १३ | परीक्षा सुरु झाल्यावर पहिल्या तीस (३०) मिनिटानंतर परीक्षा केंद्रावर कोणत्याही विद्यार्थ्यास कोणत्याही सबबीवादवर परीक्षा दालनामध्ये प्रवेश देऊ नये, वेळेवर न पोहचण्याचे सबळ कारण असल्यास विद्यापीठाशी विचारविनिमय करुन निर्णय घ्यावा. |
| १४ | Online प्रश्नपत्रिका वितरणा संदर्भात काही समस्या असल्यास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा., **0240-2403177, 0240-2403188** |

**महत्वाची सूचना;**-प्रश्नपत्रिका Download करणे, छायांकीत प्रती काढणे, इत्यादी कामे तसेच महाविद्यालयास पाठविण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिका केंद्राप्रमुख कक्षातच करण्यात यावीत.उपरोक्त सूचनांचे सर्व संबंधीतांनी काटेकोरपणे पालन करुन परीक्षा सूरळित पार पाडण्यासाठी संर्वानी सहकार्य करावे, ही विनंती.

विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद )(
संदर्भ.क्र.: पवमूमविगोक/२०२०/92 )(
दिनांक:- ०५/१०/२०२० )(

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Aurangabad-431 004. Maharashtra, India
**NAAC Accredited 'A' Grade**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
औरंगाबाद-४३१ ००४. महाराष्ट्र, भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Examinations & Evaluation Secti
परीक्षा व मूल्यमापन विभाग

| Office PBX : (0240) 2403399/400<br>B.E.E : (0240)2403200 | Web Site : www.bamu.ac.in<br>:http://bamua.digitaluniversity.ac.in | E-Mail : coe@bamu.ac.in |
|---|---|---|

Ref. No. Exam/Conf./QPDS/2020/1004 ***Important Notice*** Date:-21.09.2020

To
The Principals,/CS
All Exam Center /Affiliated Colleges
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,
Aurangabad.

**Subject;-** Regarding Requirement to Online Question Paper Distribution System QPDS for the Examinations of March/April-2020 (held in October-2020)

Sir/Madam,

With reference to the subject noted above I am directed to inform you that Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Examinations of undergraduate & post graduate courses for March/April-2020, (held in October-2020) are scheduled from 01.10.2020 The Examinations Question Papers for all Semesters will be distributed through online (QPDS) to all examinations centers.

Therefore the Mock drill for the said Question Papers distribution system is scheduled within 26th September 2020 to 29th September 2020 at 11am to 03pm. Please update your profile and perform face capture between 3pm to 5pm.

You are required the following hardware and other facilities will be there.

| | |
|---|---|
| 01. | Dedicated room as a control room with cctv camera with IP base for Question paper downloading, photocopy and stapling, enveloping etc. |
| 02. | Authentic persons allowed to enter in control room, Issue appointment letters to those person. |
| 03. | Preserve the cctv camera footage. |
| 04. | Internet connection with Static IP. |
| 05. | Dedicated Computer with Web Camera attached and functional. (do not use Laptop). |
| 06. | Min 02 MBPS Internet Connectivity (Broadband/Lease). |
| 07. | Min 01 Backup internet Connection (Wireless Dongle). |
| 08. | Hi-Speed Printer and Hi Speed Photocopy Machine. |
| 09. | Exam Officer to be Appointed for the Entire Examinations. |
| 10. | Examination officer have a mobile phone (Which should not be a smart phone, camera phone) belongs to college only. |
| 11. | You have to fill the form below. |
| 12. | Please use updated browsers (Mozilla Firefox OR Google chrome) |

Respective centers are required to fill up the information on above link before 25th September-2020 in the office time.

For any queries please communicate to us on mail I.D bamu.qpd@gmail.com or Telephonic Contact to us on 0240-2403177, 0240-403188

Thanking You.

Govt. College of Arts & Science, Aurangabad

Director
Board of Examination & Evaluation

महाराष्ट्र शासन

# शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

फोन नं. 0240-2331476 gasca1923@gmail.com फॅक्स नं. 0240 - 2331476

जा.क्र.आस्था-1/2019-20/ 2264

दिनांक :- 08/11/2019

प्रति,
मा.परीक्षा नियंत्रक,
परीक्षा व मूल्यमापन विभाग,
राजर्षी शाहू परीक्षा भवन,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**विषय :- Assessment of Answer-Books Science & Arts FacultyExamination October/November 2019**

**संदर्भ :- आपले पत्र क्रमांक: Ex/D CAS/UG CAS/OCT-NOV 2019/317 दिनांक 11/10/2019**

मा.महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून सविनय सादर करण्यात येते की, वरील संदर्भीय पत्रान्वये ऑक्टोबर/नोव्हेंबर 2019 मध्ये पार पडलेल्या परीक्षेचे पेपर तपासणीचे आदेश या महाविद्यालयाला प्राप्त झालेले आहेत.

परंतु खाली दर्शविलेल्या अधिव्याख्याते या महाविद्यालयात सुरू असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवीच्या परीक्षेच्या कामात व्यस्त आहेत.

| अ.क्र. | अधिव्याख्यात्याचे नाव | सोबत |
|---|---|---|
| 1 | डॉ.अत्तार रब्बानी | आदेश सोबत जोडत आहोत |
| 2 | प्रा.पी.आर.शिंदे | आदेश सोबत जोडत आहोत |

**कृपया स्वीकारून पोहोच देण्यात यावी ही विनंती.**

Dr. AS By hand copy o/c

आपली विश्वासू

Rakulkarni

**डॉ.श्रीमती रोहिणी कुलकर्णी - पांढरे**
**प्राचार्या**
**शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,**
**औरंगाबाद.**

Principal
Govt. College of Arts & Science
Aurangabad.

c:\documents and settings\aandhale\desktop\andhale letter 2019.docx8

महाराष्ट्र शासन
# शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

फोन नं. 0240-2331476 gasca1923@gmail.com फॅक्स नं. 0240 - 2331476

जा.क्र.आस्था-1/2019-20/ 2264

दिनांक :- 08/11/2019

प्रति,
मा.परीक्षा नियंत्रक,
परीक्षा व मूल्यमापन विभाग,
राजर्षी शाहू परीक्षा भवन,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**विषय :- Assessment of Answer-Books Science & Arts FacultyExamination October/November 2019**

**संदर्भ :- आपले पत्र क्रमांक: Ex/D CAS/UG CAS/OCT-NOV 2019/317 दिनांक 11/10/2019**

मा.महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून सविनय सादर करण्यात येते की, वरील संदर्भीय पत्रान्वये ऑक्टोबर/नोव्हेंबर 2019 मध्ये पार पडलेल्या परीक्षेचे पेपर तपासणीचे आदेश या महाविद्यालयाला प्राप्त झालेले आहेत.

परंतु खाली दर्शविलेल्या अधिव्याख्याते या महाविद्यालयात सुरू असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवीच्या परीक्षेच्या कामात व्यस्त आहेत.

| अ.क्र. | अधिव्याख्यात्याचे नाव | सोबत |
|---|---|---|
| 1 | डॉ.अत्तार रब्बानी | आदेश सोबत जोडत आहोत |
| 2 | प्रा.पी.आर.शिंदे | आदेश सोबत जोडत आहोत |

कृपया स्वीकारून पोहोच देण्यात यावी ही विनंती.

आपली विश्वासू

डॉ.श्रीमती रोहिणी कुलकर्णी - पांढरे
प्राचार्या
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

c:\documents and settings\aandhale\desktop\andhale letter 2019.docx8

# DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY
AURANGABAD-431004

# CENTER CIRCULAR
## (Revised on 11.10.2018)
## OCTOBER/NOVEMBER-2018 (WINTER SESSION)
For
### All Under Graduate (Semesters/CBCS Pattern) Examinations

It is hereby notified information of all concerned that has already announced by this University, various (Under Graduate) Examinations of Yearly and Semester pattern October/November 2018 will commence on the dates as mentioned below. The Examinations Centers at various colleges situated in University area as mentioned this circular. All Principals/Director of the affiliated Colleges are requested to note the content of this Circular and display the College same on the Notice Board for perusal to all students and all concerned.

| Sr. No | Name of Courses | Semesters / Year | Date of Examination |
|---|---|---|---|
| 1 | B.A. | I to VI | 15.10.2018 |
| 2 | B.Com | I to VI | -do- |
| 3 | B.Com (E-Commerce) | I to VI | -do- |
| 4 | B.Sc | I to VI | -do- |
| 5 | B.Sc. (Computer Science) | I to VI | -do- |
| 6 | B.Sc. (Information Technology) | I to VI | -do- |
| 7 | B.Sc. (Biotechnology) | I to VI | -do- |
| 8 | B.Sc. (Forensic Science) | I to VI | -do- |
| 9 | B.Sc. (Bioinformatics) | I to VI | -do- |
| 10 | B.Sc. (Home Science) | I to VI | -do- |
| 11 | B.Sc. (Networking Multimedia) | I to VI | -do- |
| 12 | B.Sc. (Animation) | I to VI | -do- |
| 13 | B.Sc. (Hardware and Networking) | I to VI | -do- |
| 14 | B.Sc. (Auto. Tech.) | I to VI | -do- |

| Sr. No | Name of Courses | Semesters / Year | Date of Examination |
|---|---|---|---|
| 15 | B.Sc. (Workshop Technology) | I to VI | 15.10.2018 |
| 16 | B.Sc. (Refrigeration & Air Conditioning) | I to VI | -do- |
| 17 | B.Sc. (Hotel Operation and Catering Services) | I | -do- |
| 18 | B.C.A. (Science) | I to VI | -do- |
| 19 | B.Voc. (Jewellery Designing & Gemology) | I to VI | -do- |
| 20 | B.Voc. (Horticulture Science) | I to VI | -do- |
| 21 | B.Voc. (Multimedia & Animation) | I to VI | -do- |
| 22 | B.Voc. (Food Processing Technology) | I to VI | -do- |
| 22 | B.Voc. | I to VI | -do- |
| 23 | B.C.A. (Management) | I to VI | -do- |
| 24 | B.B.A. | I to VI | -do- |
| 25 | Bachelor of Social | I to VI | -do- |
| 26 | B.Com. (CBCS) | I | 24.10.2018 |
| 27 | B.C.A. (Management) (CBCS) | I | -do- |
| 28 | B.B.A. (CBCS) | I | -do- |

University Campus, ][
Aurangabad 431 004 ][
Ref. No. Exam/Co-or/OCT-2018/ ][
Date : 11-10-2018 ][

Professor Jaishree R. Suryawanshi
Director,
Board of Examinations & Evaluation

## DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY, AURANGABAD

CENTER CIRCULAR OCTOBER/NOVEMBER 2018 EXAMINATIONS

Revised on 11.10.2018

| Sr. No. | C. Code | Venue (Name of Center) | Candidates of | Name of Courses | Alphabet | No of Students | Morning | Morning II+VI | Morning I+V | Evening | Evening III | Evening IV |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | **AURANGABAD CITY** | | | | | | | | |
| 1 | 3 | Deogiri College, **Station Road, Aurangabad** | All Candidates of **Aurangabad City** | B.Com I Sem | A to E | 1262 | 2730 | 769 | 1961 | 1100 | 803 | 297 |
| | 3 | | | B.Com II Sem | A to E | 530 | | | | | | |
| | 3 | | | B.Com III Sem | A to E | 803 | | | | | | |
| | 3 | | | B.Com IV Sem | A to E | 297 | | | | | | |
| | 3 | | | B.Com V Sem | A to E | 699 | | | | | | |
| | 3 | | | B.Com VI Sem | A to E | 239 | | | | | | |
| | 3 | | | B.Sc. I Sem | B to C | 746 | 1599 | 498 | 1101 | 578 | 363 | 215 |
| | 3 | | | B.Sc. II Sem | B to C | 315 | | | | | | |
| | 3 | | | B.Sc. III Sem | B to C | 363 | | | | | | |
| | 3 | | | B.Sc. IV Sem | B to C | 215 | | | | | | |
| | 3 | | | B.Sc. V Sem | B to C | 355 | | | | | | |
| | 3 | | | B.Sc. VI Sem | B to C | 183 | | | | | | |
| 2 | 10 | Dr.(Sow)I.B.P. Mahila College, Aurangabad | All Candidates of **Aurangabad City** | B.Sc. I Sem | D to F | 316 | 712 | 222 | 490 | 304 | 169 | 135 |
| | 10 | | | B.Sc. II Sem | D to F | 152 | | | | | | |
| | 10 | | | B.Sc. III Sem | D to F | 169 | | | | | | |
| | 10 | | | B.Sc. IV Sem | D to F | 135 | | | | | | |
| | 10 | | | B.Sc. V Sem | D to F | 174 | | | | | | |
| | 10 | | | B.Sc. VI Sem | D to F | 70 | | | | | | |
| 3 | 183 | Shiv Chhatrapati College, **CIDCO, Aurangabad.** | All Candidates of **Aurangabad City** | B.Com I Sem | R to T | 1049 | 2309 | 675 | 1634 | 895 | 629 | 266 |
| | 183 | | | B.Com II Sem | R to T | 479 | | | | | | |
| | 183 | | | B.Com III Sem | R to T | 629 | | | | | | |
| | 183 | | | B.Com IV Sem | R to T | 266 | | | | | | |
| | 183 | | | B.Com V Sem | R to T | 585 | | | | | | |
| | 183 | | | B.Com VI Sem | R to T | 196 | | | | | | |
| 4 | 12 | Pandit Jawarlal Nehru College, **Shivaji Nagar, Aurangabad** | All Candidates of **Aurangabad City** | B.Com I Sem | K to K | 523 | 1244 | 366 | 878 | 535 | 380 | 155 |
| | 12 | | | B.Com II Sem | K to K | 247 | | | | | | |
| | 12 | | | B.Com III Sem | K to K | 380 | | | | | | |
| | 12 | | | B.Com IV Sem | K to K | 155 | | | | | | |
| | 12 | | | B.Com V Sem | K to K | 355 | | | | | | |
| | 12 | | | B.Com VI Sem | K to K | 119 | | | | | | |
| 5 | 13 | Dr.Rafiq Zakaria College for Women, **Navkhanda, Aurangabad.** | All Candidates of **Aurangabad City** | B.A. I Sem | P to R | 537 | 966 | 217 | 749 | 477 | 255 | 222 |
| | 13 | | | B.A. II Sem | P to R | 171 | | | | | | |
| | 13 | | | B.A. III Sem | P to R | 255 | | | | | | |
| | 13 | | | B.A. IV Sem | P to R | 222 | | | | | | |
| | 13 | | | B.A. V Sem | P to R | 212 | | | | | | |
| | 13 | | | B.A. VI Sem | P to R | 46 | | | | | | |
| | 13 | | | B.Com I Sem | L to O | 535 | 1205 | 356 | 849 | 490 | 347 | 143 |
| | 13 | | | B.Com II Sem | L to O | 253 | | | | | | |
| | 13 | | | B.Com III Sem | L to O | 347 | | | | | | |
| | 13 | | | B.Com IV Sem | L to O | 143 | | | | | | |
| | 13 | | | B.Com V Sem | L to O | 314 | | | | | | |
| | 13 | | | B.Com VI Sem | L to O | 103 | | | | | | |

Note : Only change in Highlight Yellow colour background

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
### परीक्षा व मूल्यमापन विभाग

**परिपत्रक/परीक्षा व मूल्यमापन मंडळ/समन्वय/२०२०/कोव्हीड**

**परिपत्रक**

या परिपत्रकाद्वारे प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक यांना सूचित करण्यात येते की, मा. कुलगुरूंसमवेत व्हिडिओ कॉन्फरंसिंगद्वारे झालेल्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासन यांनी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचना व प्राप्त निर्देशांनुसार विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षार्थींच्या परीक्षा माहे जुलै, २०२० मध्ये आयोजित करावयाच्या आहेत. त्या परीक्षा घेतांना कोरोना या जागतिक महामारीच्या विषाणुच्या पार्श्वभूमीवर आपल्याला एक व्यक्ती दुसऱ्यापासून केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या मानकानुसार ठरावीक शारिरीक अंतर ठेवणे आवश्यक आहे. ज्यामुळे कोरोणा या विषाणुचा प्रसारही होणार नाही व परीक्षाही व्यवस्थितरित्या संपन्न होण्यास मदत होईल.

म्हणून सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष परीक्षेच्या आयोजनासाठी परीक्षा केंद्र निश्चित करतांना महाविद्यालये/परिसंस्थांकडे उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधांबद्दलची माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी महाविद्यालये/परिसंस्थांनी खालील कोष्टकात त्यांच्या महाविद्यालय/परिसंस्थेकडे उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधांची माहिती भरून coe@bamu.ac.in आणि coordination.exam@bamu.ac.in या ई-मेल पत्त्यावर स्पष्टपणे वाचता येईल या स्वरूपात दि.. २५-०५-२०२० पूर्वी पाठवावी. माहिती शक्य असल्यास Microsoft Office Excel Worksheet मध्ये Times New Roman-8 च्या साईजमध्ये पाठविली तर तात्काळ नियोजनासाठी अत्यंत उपयुक्त व महत्त्वपूर्ण राहील.

| | | |
|---|---|---|
| **Name & Address of the College :** | | |
| **College Code:** | | |
| **Name of the Principal:** | | |
| **Sr. No.** | **Room No.** | **Number of Desk** |
| 1. | | |
| 2. | | |
| 3. | | |
| 4. | | |
| 5. | | |
| **Total** | | |

तरी, सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी ही विनंती.

डॉ. गणेश मंझा
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

विद्यापीठ प्रांगण, )(
औरंगाबाद )(
**संदर्भ :** पवमूमं/समन्वय/२०२०/कोव्हीड )(
**दिनांक:** १७-०५-२०२० )(

Scanned with CamScanner

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
AURANGABAD -431 004 Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
औरंगाबाद- ४३१ ००४ महाराष्ट्र, भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त

P.G.Admission Unit    पदव्युत्तर प्रवेश विभाग

P.G. Office :- (0240) 2403123    WEBSITE : www.bamu.ac.in    : http://bamua.digitaluniversity.ac    E-mail : pgsection@bamu.ac.in

संदर्भ क्र. परीक्षा/प.मू.व.मं./समन्वय/२०२०/२५६    दिनांक:- १०-०५-२०२०

## कोरोना (कोविड-१९) विद्यार्थी तक्रार निवारण व समुपदेशन कक्ष

**उद्देश :-**

कोरोना (कोविड-१९) विषाणूच्या प्रादुर्भावामुळे व तदानुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी विद्यार्थ्यांच्या परीक्षा व त्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने त्यांना उन्हाळी परीक्षा एप्रिल-मे २०२० बाबत मार्गदर्शन मिळावे तसेच त्यांच्या तक्रारीचे निवारण व्हावे यासाठी जिल्हानिहाय विद्यार्थी तक्रार निवारण व समुपदेशन समिती स्थापन केली आहे.

**ठळक मुद्दे व व्याप्ती :-**

कोरोना (कोविड-१९) विद्यार्थी तक्रार निवारण व समुपदेशन कक्ष हा दोन स्तरावर काम करेल. यामध्ये मा. प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली एक केंद्रीय समिती व विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या चार जिल्ह्यामध्ये स्थापन करण्यात आलेली जिल्हावार समिती विद्यार्थ्यांची उन्हाळी २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या सर्व पदवी, पदव्युत्तर परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करेल व त्यांच्या तक्रारीचे निवारण करेल.

विद्यापीठांतर्गत येणाऱ्या चारही जिल्ह्यामध्ये (औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबाद) स्थापन करण्यात आलेल्या समितीचे प्राथमिक लक्ष हे विद्यार्थ्यांच्या समस्या ऐकून घेणे, त्या सोडविणे व त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे जेणेकरुन कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत त्यांचे मनोबल वाढेल.

या सर्व जिल्हावार समितीला मा. कुलगुरु मार्गदर्शन करतील व उन्हाळी परीक्षा २०२० च्या दृष्टीने उद्‌भवणाऱ्या समस्याचे निरसन करुन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व मनोबल वाढविण्याच्या दृष्टीने कार्य करता येईल.

विद्यापीठ परिसरातील सर्व विभाग प्रमुखांची लवकरच मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक आयोजित करण्यात येऊन या बैठकीमध्ये आगामी उन्हाळी परीक्षा २०२० साठी विद्यापीठ विभागस्तरावर आवश्यक कार्यवाही बाबत चर्चा करण्यात येईल.

याबाबतीत असे अपेक्षित करण्यात येते की, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ हे त्याच्या अख्त्यारीतील परीक्षा नियंत्रण प्रणाली तत्परतेने कार्यान्वीत करुन अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे निकाल वगळता अन्य विद्यार्थ्यांचे निकाल हे १५ जून २०२० पर्यंत तयार करुन घोषित करतील.

अंतिम वर्षाच्या परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षाचे वेळापत्रक हे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ माहे जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर करुन जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून परीक्षेस सुरवात होईल.

विद्यापीठ परिसरातील सर्व विभाग प्रमुख त्यांच्या विभागातील अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रक तयार करुन ते संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांना परीक्षा दिनांक तसेच निकाल दिनांकासह विभागीय समितीच्या शिफारशीसह सादर करतील.

संलग्न : जिल्हानिहाय तक्रार निवारण व
समुपदेशन समिती सदस्यांची यादी.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# The Committees

**Central Committee of CSGC20:**

| S. N. | Name | Designation | Mobile No. | Email ID |
|---|---|---|---|---|
| 1 | Dr.Pravin S.Wakte, | Chairman | 9422212845 | provc@bamu.ac.in |
| 2 | Dr. Bhalchandra Waikar | Member | 9284553922 | bbwaykar@gmail.com |
| 3 | Dr. Walmik Sarode | Member | 9822651188 | Walmik_sarwade@hotmail.com |
| 4 | Dr.Prashant Amrutkar | Member | 9822955053 | dramrutkar@gmail.com |
| 5 | Dr.Ganesh R. Manza | Member | 9421684134 | ganesh.manza@gmail.com |

Aurangabad District:
Name of Counselling Center: **Dr Babasaheb Ambedkar Marathwada University, Campus**

| S.N. | Name | Designation | Mobile number | Email ID |
|---|---|---|---|---|
| 1 | Dr.Mustajeeb Khan | Coordinator | 9923242538 | mustajeebkhan@@gmail.com |
| 2 | Dr.Dole B. N. | Member | 9423343923 | drbndole.phy@gmail.com |
| 3 | Dr.Aparna Ashtaputre | Member | 9923800937 | aparna.sisode@yahoo.co.in |
| 4 | Dr.Nandita Patil | Member | 9823503993 | nandinips.patil21@gmail.com |
| 5 | Dr.Giribala Bondle | Member | 9890766118 | gmbondle@gmail.com |

Osmanabad District
Name of Counselling Center: **Dr Babasaheb Ambedkar Marathwada University, Sub Campus**

| S.N. | Name | Designation | Mobile number | Email ID |
|---|---|---|---|---|
| 1 | Dr.Prashant Dixit | Coordinator | 9421335704 | prashantdixit74@gmail.com |
| 2 | Dr.Suyog Amrutrao | Member | 9766350127 | suyogmba@gmail.com |
| 3 | Dr.Manisha Asore | Member | 9823954321 | masore.eduobad@bamu.ac.in |
| 4 | Dr.Maheshwar Kallave | Member | 9422996251 | maheshkallave@gmail.com |
| 5 | Dr.Kishan P Haval | Member | 9423531375 | havalkp@gmail.com |

Jalna District
Name of Counselling Center: **J.E.S. College, Jalna**

| S.N. | Name | Designation | Mobile number | Email ID |
|---|---|---|---|---|
| 1 | Prin. J. D. Kabra | Coordinator | 09404234553 | jesjalna@Hotmail.com |
| 2 | Prof. Shivnarayan Bajaj | Member | 09423457229 | shivnarayanbajaj@gmail.com |
| 3 | Prof. Laxmikant Shinde | Member | 8308312233 | Jeszoology@gmail.com |
| 4 | Dr. Hemant Varma | Member | +919405485389 | vermahj@gmail.com |
| 5 | Dr. Anand Kulkarni | Member | +919422655479 | anandkulkarni1366@gmail.com |

Beed District

Name of Counselling Center: **Balbhim College, Beed**

| S.N. | Name | Designation | Mobile number | Email ID |
|---|---|---|---|---|
| 1 | Prof.Kokate Babasaheb Dagdu | Coordinator | 9545154555 | drbkokate@gmail.com |
| 2 | Dr.Santosh Shivajirao Undare | Member | 7776800391 | sschem14@gmail |
| 3 | Dr.Mohite Ganesh Aasaram | Member | 9423187631 | dr.gamohite@gmail.com |
| 4 | Dr. Vibhute P.K. | Member | 9850806387 | vibhutep16@gmail.com |
| 5 | Dr. Kale Suhas Babasaheb | Member | 9822622964 | ctekbeed@gmail.com |

**COVID-19 Students Grievance Committee for Professional Courses: All Districts**

| S.N. | Name | Designation | Mobile number | Email ID |
|---|---|---|---|---|
| 1 | Dr.Ulhas Shiurkar | Coordinator | 9011078272 | shiurkar@gmail.com |
| 2 | Dr.V.K.Mourya | Member | 9890183001 | vkmourya@gmail.com |
| 3 | Dr.Santosh Bhosle | Member | 9822768246 | spbhosle2001@gmail.com |
| 4 | Dr.S.B.Patil | Member | 9422711881 | hodarch@jnec.ac.in |
| 5 | Dr.Anita Bhole | Member | 9423028159 | Bholeanita66@gmail.com |

Date : 10-05-2020

Director,
Board Of Examinations and Evaluation

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## परीक्षा व मूल्यमापन विभाग

## परिपत्रक/परीक्षा व मूल्यमापन मंडळ/समन्वय/२०२०/कोव्हीड

## दुरूस्ती परिपत्रक

**संदर्भः** (१) ह्या कार्यालयाचे परिपत्रक संदर्भ क्र. परीक्षा/प.व मू.मं./समन्वय/२०२०/९५५ दि. १०-०५-२०२०.
(२) अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियाजन करण्याकरिता नियुक्त राज्यस्तरीय समितीचे समन्वयक ह्यांच्याकडून दि. १५-०५-२०२० रोजी प्राप्त पत्र.

सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, कोरोना (कोवीड-१९) विषाणुच्या प्रादुर्भावामुळे व तदनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरिता मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी गठीत केलेल्या राज्यस्तरीय समितीच्या अहवालातील तरतुदींनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील सर्व शैक्षणिक विभाग, विद्यापीठ उपपरिसर, संचलित व संलग्नीत महाविद्यालयांतील उन्हाळी परीक्षा-२०२० च्या परीक्षेसाठी परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे परीक्षा व निकाल लावण्याबाबत उपरोक्त संदर्भांकित संदर्भ क्र. १ नुसार परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते.

**मात्र, ह्याबाबत राज्यस्तरीय समितीचे समन्वयक ह्यांचे दि. १५-०५-२०२० रोजीच्या पत्रानुसार, संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकातील सूचना क्र. ४ मधील कोष्टकाच्या शेवटच्या रकान्यात ५० टक्के गुणांसाठी ग्राह्य धरण्यात येणारी सत्रे नमूद करण्यात आली होती त्यात आता अंशतः बदल करण्यात येत असून तो खालीलप्रमणे आहेः**

| अ. क्र. | अभ्यासक्रम | उन्हाळी परीक्षा-२०२० मधील सत्र | ५० टक्के गुणांसाठी ग्राह्य धरण्यात येणारी सत्रे (सरासरी गुण) |
|---|---|---|---|
| १. | पदवी अभ्यासक्रम (३ वर्षीय) | सत्र-द्वितीय | प्रथम सत्राचे सरासरी गुण |
| | | सत्र-चतुर्थ | तृतीय सत्राचे सरासरी गुण |
| २. | पदवी अभ्यासक्रम (४ वर्षीय) | सत्र-द्वितीय | प्रथम सत्राचे सरासरी गुण |
| | | सत्र-चतुर्थ | तृतीय सत्राचे सरासरी गुण |
| | | सत्र-सहावे | पाचव्या सत्राचे सरासरी गुण |
| ३. | पदवी अभ्यासक्रम (५ वर्षीय) | सत्र-द्वितीय | प्रथम सत्राचे सरासरी गुण |
| | | सत्र-चतुर्थ | तृतीय सत्राचे सरासरी गुण |
| | | सत्र-सहावे | पाचव्या सत्राचे सरासरी गुण |
| | | सत्र-आठवे | सातव्या सत्राचे सरासरी गुण |
| ४. | पदव्युत्तर पदवी (२ वर्षीय) | सत्र-द्वितीय | प्रथम सत्राचे सरासरी गुण |
| ५. | पदव्युत्तर पदवी (३ वर्षीय) | सत्र-द्वितीय | प्रथम सत्राचे सरासरी गुण |
| | | सत्र-चतुर्थ | तृतीय सत्राचे सरासरी गुण |

तसेच, जर पूर्वीच्या परीक्षा किंवा सत्रांचे गुण उपलब्ध नसल्यास विशेष करून वार्षिक सत्राच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षांच्या बाबतीत १०० टक्के अंतर्गत मूल्यमापन करण्यात यावे. या शासन मार्गदर्शक सूचनांप्रमाणे बी.एड. हा अभ्यासक्रम वार्षिक अभ्यासक्रम असल्याने प्रथम वर्षाचा निकाल १०० टक्के अंतर्गत मूल्यमापनाच्या गुणांच्या आधारे लावण्यात येईल. त्यामुळे उपरोक्त नमूद संदर्भीय परिपत्रकातील सूचना क्र. ४ मधील बदलाव्यतिरिक्त इतर सर्व सूचना, निर्देश व माहिती तीच राहील.

तरी, सर्व संबंधितांनी बदलाची नोंद घ्यावी ही विनंती.

डॉ. गणेश मंझा
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

विद्यापीठ प्रांगण, )(
औरंगाबाद )(
**संदर्भ :** पवमूमं/समन्वय/२०२०/कोव्हीड )(
**दिनांकः** २०-०५-२०२० )(

Scanned with CamScanner